॥ श्रीराम समर्थ ॥

- भक्तियोग -

आपल्या भारतीय संस्कृतीला वेद-वेदांताची फार मोठी परंपरा आहे. चार वेद, चार वर्ण, चार आश्रम आणि चार पुरुषार्थ अशा सोळा खांबांवर हे संस्कृति-मंदिर उभे आहे. रामायण-महाभारतासारखी महाकाव्ये याच भूमित प्रेमादराने गायली जात आहेत. हे सर्व वाङ्मय प्रामुख्याने देववाणी-संस्कृत भाषेत असल्याने त्यांचा अभ्यास मूठभर विद्वानांपर्यंत मर्यादित राहिला. भगवद्गीता हा तर केवळ पूज्येचा ग्रंथ होता.

महाराष्ट्रामध्ये मात्र माऊलींची ज्ञानेश्वरी आणि समर्थांचा ग्रंथराज दासबोध यांनी अध्यात्म जिवंत ठेवले. आपल्याजवळ असलेली आध्यात्मिक श्रीमंती त्यांनी जनसामान्यांना भरभरून वाटली. समर्थांच्या विपुल वाङ्मयामध्ये ग्रंथराज दासबोध मुकुटमण्याप्रमाणे शोभून दिसतो. वीस दशक आणि दोनशे समासातील ओव्यांमधून प्रत्यक्ष समर्थ भक्तांशी संवाद साधतात. आपल्या सोप्या सरळ भाषेतून त्यांनी गुह्य ज्ञान लोकांसमोर आणले. या ग्रंथात त्यांनी अनेक विषय हाताळले असले तरी भक्तिला यात अनन्यसाधारण महत्व आहे.

भक्तियेन योगे देव । निश्चये पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी ।

या समर्थवचनावरून मुख्य प्रतिपाद्य विषय भक्ति आहे हे स्पष्ट होते. या भक्तिमार्गावरून चालताना समर्थ शिष्याचे बोट धरून त्याला चालवतात. भक्तिमार्गाचे महत्व, त्याची आवश्यकता, त्याचे स्वरूप, येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय नेमकेपणाने उलगडून सांगताना अक्षरशः ते आपल्याबरोबरच असतात. त्यामुळेच मनात कोणतीही भीति आशंका येतच नाही. मग शिष्याची वाटचाल जोमाने सुरू होते. मार्गातील बारकावे समजावून घेतले जातात.

आपल्या जीवनाचे सुकाणू सद्गुरूंच्या हाती सोपवून त्यांनी दाखवलेल्या मार्गावर निष्ठेने चालणे ही खरी उपासना! उपासनेचा खरा अभ्यास अंतरंगातच चालतो. त्यासाठी बाहेर धावणारे मन उफराटे करून वृत्ति आतच स्थिरवाव्या लागतात.

© www.mauliraghuveer.com

सद्गुरुंच्या कृपाशीर्वाद आणि शिष्याची भक्ती, निष्ठा यांचा संयोग झाला की साधकाला रोकडा आत्मसाक्षात्कार घडणारच अशी ग्वाही इथे समर्थ देतात.

हा भक्तीचा सोपान नऊ पायऱ्यांचा आहे. यातील प्रत्येक पायरी चढताना पुढची पायरी खुणावत असते. मात्र इथे घाई करून चालणार नाही. प्रत्येक पायरीवर असणारे धोके, खाचखळगे समर्थ समजावून सांगतात आणि साधकाला कळीचे, मार्मिक मुद्दे उलगडून दाखवतात. साधकाला सक्षम बनविण्यासाठी हे आवश्यकच आहेत.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

यातील शेवटच्या पायरीवर भगवंत दोन्ही बाहू पसरून भक्ताला जवळ घेण्यासाठी उत्सुक आहेत, हे दृश्य भक्ताला पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देते, नवीन ऊर्जा देते. या मार्गावर चालण्यासाठी वर्ण, धर्म, ज्ञान, पंथ या कशाचीही अट नाही. कोणीही या भक्तिमार्गावरून वाटचाल करू शकतो. श्रद्धा आणि निष्ठा मात्र निश्चित हवी.

या मार्गावरून चालायला सुरुवात केल्यावर हळूहळू साधकात ठळक परिवर्तन दिसायला लागते. विवेक आणि वैराग्याच्या खुणा स्पष्टपणे दिसू लागतात. विवेक व वैराग्य हे शब्द प्रारंभी जरी जड वाटत असले तरी त्यांचा सोपा अर्थ म्हणजे भगवंताविषयी आवड हाच विवेक आणि विषयाची नावड हेच वैराग्य आहे. या मार्गावरून चालताना हे भावाचे रूपांतरण हळूहळू परंतु निश्चितपणे होत जाते. किंवा नेमक्या शब्दात मांडायचे झाले तर हा क्रमविकास आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे यात सहजता आहे. पहिल्या पायरीवर पाऊल ठेवताना कदाचित अनेक शंका मनात येतील. परंतु या मार्गाकडे तुम्ही वळलात ना की प्रत्यक्ष भगवंताचेच होऊन जाता. तुमचा भार, शीण आपोआप कमी होऊन जातो. आणि जेव्हा अंतिम ध्येयापर्यंत भक्त पोहोचतो तेव्हा भक्त वेगळेपणाने उरतच नाही. भक्त व भगवंत

© www.madhaveeraghuveer.com

एकच होऊन जातो. या मार्गाच्या आरंभी भक्त भगवंतावर अधिकार गाजवत असतो. देव माझा आहे असा अभिमान बाळगून असतो. पुढे हा अभिमान कमी होतो तेव्हा मी देवाचा आहे अशी भावना बाळगू लागते आणि शेवटी तर मी आणि देव एकच आहोत असा साक्षात्कार होतो.

देव पहायासी गेलो । देव होऊनिया ठेलो ।

अशी अवस्था होऊन जाते कारण भक्ताने आपला सारा मीपणा भगवंताच्या पायावर वाहिलेला असतो. देव व भक्त एकमेकात मिसळून जातात. या भक्तिमार्गा-वरील वाटचालीचा मागोवा घेण्यापूर्वी भक्ती म्हणजे काय हे जाणून घेऊ या. व्याकरणदृष्ट्या विचार केला तर भज् या धातुपासून 'भक्ती' शब्द बनला आहे. त्याचा अर्थ आहे रस घेणे, जाणून घेणे. आणि खरोखरच ईश्वराचा महिमा जाणून घेणे म्हणजेच भक्ती आहे. एकदा का भगवंताची ओढ वाटायला लागली ना की त्याच्याबद्दल ऐकावे, बोलावे, पहावे, त्याचेच गुण गावेत अशी ओढ लागते. संतांच्या संगतीत रहावे. प्रवचन-कीर्तन ऐकावे. कथांमधून त्याच्या रूपागुणाचे वर्णन करावे असे सतत वाटत राहणे हा भक्तीचा एक पैलू आहे. दुसऱ्या अर्थाने विचार केला तर भाग या शब्दापासून भक्ती शब्द तयार झाला आहे. प्रत्येक जीव हा ईश्वराचाच अंश, वाटा आहेच. अविद्येच्या प्रभावामुळे आपले वास्तविक सत्यस्वरूप विसरून गेलेल्या जीवाला पुन्हा मूळ स्वरूपापर्यंत पोहोचवते ती भक्ती! भंजन करणे म्हणजे तोडणे-फोडणे, नाश करणे. एकदा का भक्तीच्या मार्गाने चालू लागले म्हणजे अज्ञान, अहंकार या शत्रूंचा पाडाव होऊ लागतो. अविद्येचे पटल दूर झाले की अंतःकरणात भगवंताचे निर्मळ प्रतिबिंब दिसू लागते. हाही भक्तीचाच आविष्कार आहे. किंवा सेव् याचा अर्थ आश्रय घेणे, शरण जाणे, स्वीकारणे असाही होऊ शकतो. या अर्थाने भगवंतच एकमेव आधार, स्वामी आहे, असे मानून त्याच्यावर आपला भार टाकणे ही भक्तीची परिसीमा आहे.

© www.madhaveeraghuveer.com

या सर्व विश्वावर त्याचीच सत्ता आहे. हा देह त्याला मी माझे म्हणतो तोही त्याच्याच सत्तेने चालतो हे एकदा मनापासून पटले की सारे कर्तृत्व-भोक्तृत्व गळून पडते. सारा भार त्याच्यावर टाकला की आपोआप हलकेपणा येतो. शीण नाहीसा होतो.

मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी।
राम कर्ता ऐसे म्हणसी। तेणे पावसी विश्राम॥

सारांश काय, तर व्यवहारातील सर्व कर्मे तर करायची! कोणतेही कर्म टाळायचे नाही. कशाचाही त्याग करायचा नाही. मात्र जी जी कामे करू ती ती सगळी रामाला अर्पण करायची. त्यांचे कर्तृत्व रामाकडे द्यायचे. समर्थांनी कुठेही प्रपंच वाईट असे म्हटले नाही. केवळ त्यातील आसक्ती वाईट आहे. तेवढी काढून टाकली म्हणजे प्रपंच बाधक ठरत नाही. त्यासाठी भक्तियोग सांगण्यापूर्वी दृश्य जगताची व्यर्थता पटवून सांगतात. जे जे दिसते ते ते नासते हे एकदा मनोमन पटले की शाश्वत काय, चिरंतन टिकणारे काय याचा शोध सुरू होतो. त्यातूनच भक्ती उमलू लागते.

प्रपंचातील सर्व कर्तव्ये पार पाडत असतानाच कधीतरी सद्ग्रंथांचे श्रवण घडते. श्रवणाने अनेक संशय फिटतात. श्रद्धा दृढ होते. संत-महंतांकडून ऐकलेला उपदेश अंतःकरणात ठसतो. कारण त्यांचे बोलणे पोकळ नसते, त्याला आचरणाची जोड असते. भगवंतांच्या सगुण स्वरूपाचे वर्णन म्हणजे चरित्र किंवा कथा तर निर्गुण स्वरूपाचे वर्णन म्हणजे तत्त्वमीमांसा आहे. ही दोन्ही ऐकत राहिल्याने भक्त आणि भगवंत यातील दुजेपण सरते आणि तदाकारतेचे रहस्य दृष्टिपथात येऊ लागते. त्यामुळे पुष्कळ ऐकले असले तरी त्यातील असार टाकून द्यावे व सार तेवढे ग्रहण करावे. यालाच 'श्रवणभक्ती' म्हणतात.

माणसाचा स्वभाव असा आहे की त्याने पुष्कळ ऐकले की ते दुसऱ्याला सांगितल्यावाचून त्याला स्वस्थ

बसवत नाही. आणि ते साहजिकच आहे. कारण श्रवणानंतर आतमध्ये चिंतन मनन घडते. त्यातून आनंद मिळू लागतो. हा आनंद इतरांपर्यंत पोहोचवावा अशी नैसर्गिक उर्मि वाटते. त्यातून 'कीर्तनभक्ती' उदयाला येते. वाचेचे सार्थक झाल्यासारखे वाटते. मात्र त्यासाठी अभ्यास हवा. अर्धवट ज्ञान असेल तर व्यर्थ बोलू नये. आधी ग्रंथ अभ्यासावेत. उत्तम पाठांतर असले तरी ते योग्य ठिकाणी नेमकेपणाने वापरता यायला हवे. शास्त्राचा आधार घेऊनच पण रंजकतेने विषय मांडता यायला हवा. कीर्तनाने श्रोत्यांच्या मनातील संशय विरून जातात आणि भगवद्भक्तीची ओढ वाढू लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कीर्तनाने परमेश्वर प्रसन्न होतो. हा परमेश्वर संपूर्ण ब्रह्मांडात व्यापून राहिला आहे. तो अमूर्त, ज्ञानमय, आनंदस्वरूप आहे. त्याला शोधायला कुठे दूर जायला नको.

मूर्त आणि अमूर्त यांना जोडणारी एक अमूल्य वस्तु आहे. ती म्हणजे 'नामस्मरणभक्ती'! त्यायोगाने दृश्यातून अदृश्यात व पुढे अव्यक्तापर्यंत पोहोचता येते. नामाइतके दुसरे सोपे साधन नाही. त्यासाठी काही खर्चावे लागत नाही.

बहु चांगले नाम या राघवाचे
अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे।

मानवी जीवांना तर नाम हेच स्वानंदसाधन आहे. भगवंताच्या अनेक नामांपैकी कोणतेही नाम घ्यावे. मात्र नियमित नाम घ्यावे, श्रद्धेने घ्यावे, अखंड घ्यावे. परमेश्वर कृपा केल्याशिवाय राहणार नाही.

मुखामध्ये नाम, अंतःकरणात राम आणि हाताने काम करीत राहिले तर भगवंत सुद्धा भक्तांच्या प्रेमबंधनात सापडतो. त्यासाठी सद्गुरूंची आपलेपणाने चरणसेवा करणे म्हणजे 'पादसेवन भक्ती'! सद्गुरूंची सेवा म्हणजे त्यांनी दाखवलेल्या मार्गाने जाऊन भगवंतकृपेला पात्र होणे. ब्रह्मज्ञान हे गुह्य ज्ञान आहे. अत्यंत समाधान हे त्याचे चिन्ह आहे; अशा अनेक गुह्य गोष्टी सद्गुरूंच्या सान्निध्यात

©www.madhavraghuveer.com

समजायला लागतात. परमार्थाची अनेक अंगे उघड होतात. या पादसेवन भक्तीच्या आचरणाने सायुज्यमुक्ती लाभते.

सद्गुरूंनी भगवत्प्रेमाची गोडी लावल्यावर भक्ताला आपल्या उपास्य देवतेचा सत्कार, पूजा केल्याखेरीज चैन पडत नाही. आवाहन, आसन, स्नान, सुगंधी द्रव्ये, वस्त्र, नैवेद्य यातील उत्तमोत्तम वस्तूंनी अर्चन करण्याची तळमळ त्याला लागते. ही 'अर्चनभक्ती' पाचवी भक्ती आहे. प्रत्यक्ष उपचारांनी जसे प्रेमास्पदाचे पूजन करता येते तसेच मानसपूजेने सुध्दा त्याला आळवता येऊ शकते. कल्पनेने पूजा करायचा सराव झाला तर मन सूक्ष्मात विहार करू लागते आणि अधिकाधिक अमूर्तात रमू लागते. त्यातून विलक्षण अशा प्रसन्नतेचा अनुभव येतो.

पूजेच्या षोडशोपचारांमधील अखेरचा उपचार म्हणजे नमस्कार आहे. हीच सहावी 'वंदनभक्ती'! वंदन म्हणजे केवळ शारीरिक क्रिया नाही तर त्या चरणी लीन होण्याचा, शरण जाण्याचा भाव आहे. वंदन हे अंतरातील नम्रतेचे एक चिन्ह आहे. नम्रता आली की अभिमान क्षीण होतो. मीपणा कमी होऊ लागतो. चराचरामध्ये त्या सर्वसाक्षी परमेश्वराची लीला दिसायला लागते. प्राणिमात्रांमध्ये केवळ एक भगवंतच भरून राहिला आहे असा भाव मनापासून जागतो. एका नमस्कारामध्ये इतके सामर्थ्य आहे की आपोआप माणसामध्ये सद्बुध्दी उत्पन्न होते. नमस्कार हे श्रेष्ठ साधन आहे. नमस्कारामुळे भगवंत आपल्याकडे ओढला जातो.

नमस्काराने निर्माण झालेल्या नम्रतेचा परमोत्कर्ष म्हणजे 'दास्यभक्ती' ही सातवी भक्ती! सर्वच संत-महंत स्वतःला दास मानतात. माउलींचे अनेक शिष्य असले तरी ते स्वतःला निवृत्तिदास म्हणवून घेतात. समर्थांनी तर साधनाकाळात आपले नारायण नाव सोडून स्वतःला रामाचा दास मानले. आपल्या स्वामींना प्रसन्न ठेवणे हीच भक्ताची इतिकर्तव्यता असते. त्यासाठी कितीही हलके काम करण्याची तयारी असते. आणि हे केवळ आराध्यदेवत किंवा सद्गुरु

© www.madhaveeraghuveer.com

यांच्यापुरते मर्यादित राहत नाही. आपला स्वामी चराचरात व्यापून आहे अशी प्रचीति आल्यावर सर्वच प्राणिमात्रांची सेवा करणे म्हणजे भगवंताची सेवा हा भाव जागू लागतो. आणि तो हातचे काहीही राखून न ठेवता मनोभावे 'दास्यभक्ती' करतो.

आता दोघांमध्ये कोणताही आडपडदा राहत नाही. इथे भगवंत आपले स्वामीपण विसरतात आणि दासाकडे मित्रत्वाने पाहतात. भक्ताच्या मनात सुरुवातीला असणारा दासत्वाचा भाव हळूहळू विरू लागतो. त्याचा संकोच, भीती दूर होते. दोघांमध्ये वेगळेपणा उरत नाही. भगवंताचे गुण भक्तामध्ये उतरतात. एवढेच नाही तर रंग रूप देखील भगवंताप्रमाणे होऊ लागते. भक्तीची ही मधुर अवस्था आहे. दोन स्वच्छ आरसे एकमेकांसमोर ठेवल्यावर कोणाचे प्रतिबिंब कशात पडले आहे ते कळू नये अशी विलक्षण अवस्था होते. जो भगवंताला प्रिय आहे तो अर्थातच सर्व जीवांचा मित्र बनतो. अशा भक्ताची संपूर्णपणे काळजी भगवंतच घेतात. तो त्याचा कैवारी होतो. भक्ताची इच्छा वेगळेपणाने उरतच नाही. ती भगवंताच्या इच्छेत विलीन होते. ही आठवी भक्ती म्हणजे सख्यभक्ती! एकदा सख्य जुळले की ते कधीच तुटत नाही.

आता याही पुढची पायरी म्हणजे 'आत्मनिवेदनभक्ती'! आता भक्ताला स्वतःचा विसर पडतो. तो आनंदसागरात डुंबू लागतो. भगवंताशी तो तादात्म्य पावतो. ही अद्वैतभक्ती! आतापर्यंत सतावणारा 'मी कोण?' हा प्रश्न आता उरतच नाही. 'तो मी आहे' किंवा 'मी तो आहे' याची साक्षात अनुभूति येते. देहबुद्धीच्या आश्रयाने वावरणारा 'मी' आता तत्त्वविचारापुढे टिकत नाही. हा खोटा 'मी' नाहीसा होणे म्हणजेच 'आत्मनिवेदन'

असा हा भक्तिमार्गाचा नऊ पायऱ्यांचा सोपान आहे. सुरुवातीला साशंक असणारा जीव अखेरीस निःशंक होतो. त्याच्या मनातील संदेह दूर होतात. भक्त व भगवंत नुसते एकसारखे नाही तर एकरूपच होऊन जातात. थेंबुटा सागरी बुडाल्यावर जसा तो वेगळेपणाने बाजूला काढता येत नाही. तशी आता भक्ताची अवस्था होते.

© www.madhavaraghuveer.com

'मी'पणाचा बळी दिल्यावर अवतरणारी ही सहजसमाधि म्हणजे परमेश्वराचा प्रसाद आहे. प्रेमाच्या यज्ञात आपल्या सर्व इच्छा भस्मसात व्हाव्यात.

देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे ।
मग सहजचि स्वभावे । कृपाळु देव ॥

परिणामी भक्त भगवत्स्वरूपच होतो. मीठाची बाहुली समुद्राचा तळ शोधायला निघाली तर ती वेगळेपणाने उरेल का? तशी भक्ताची अवस्था होते. रामाच्या प्राप्तीसाठी सुरुवातीला जपमाळ घेणे आवश्यक असले तरी अखेरीस माळ सुटायला हवी. कशातच न गुंतणे, 'अहं'चे विसर्जन करणे-होणे ही भक्तीची परमोच्च अवस्था आहे.

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावे सेवटी । प्राण तो ही वेचावा ॥

श्रवणभक्तीच्या पहिल्या पायरीपासून सुरु झालेला हा प्रवास आत्मनिवेदनापर्यंत येऊन पोहोचतो. भक्त भगवंतामध्ये मिसळून जातो. द्वैताचा मागमूसही उरत नाही. उरते ते केवळ अद्वैत! या मार्गावर तुम्ही आम्ही सर्वांचा प्रवास सुरु आहे. शेवटच्या मुक्कामापर्यंत पोहोचण्यासाठी, राममय होण्यासाठी तो कृपाळु प्रभू रामच आपल्याला बळ देवो ही त्याच्याच चरणी प्रार्थना!

जय जय रघुवीर समर्थ ।

फोन. ९३७३३६६६११

माधवी रघुवीर जोशी
डी-९७, वुडलँडस
गांधी भवन जवळ
कोथरूड, पुणे
४११०३८